पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/२६३/२०१०
दिनांक : १०/२/२०१०

प्रति,

मा.................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक २०/२/२०१० रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शनिवार दिनांक २०/२/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

## मा. विधी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक : १६

दिनांक : २०/२/२०१० वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शनिवार, दिनांक २०/२/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

(अ) दिनांक १५.१.२०१० व ५.२.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १४) सभावृत्तांत कायम करणे.

(ब) दिनांक ५.२.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक :- १) श्री.साहेबराव गायकवाड, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २५/०९/२००९ पासून एक वर्ष कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२०.२.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक :- २) श्री.ए.वाय.कारचे, मुख्याधिकारी गट - अ यांची सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२०.२.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक :- ३) चिंचवड मैला शुध्दीकरण केंद्र त्रैवार्षिक कालावधीकरीता चालन देखभाल दुरुस्तीस देणेकामी र.रु.२,०९,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२०.२.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक :- ४) कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा - १ त्रैवार्षिक कालावधीकरीता चालन देखभाल दुरुस्तीस देणेकामी र.रु. २,४१,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२०.२.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक :- ५) भुगयो अंतर्गत वाल्हेकरवाडी पंप हाउस येथील पंपींग मशीनरींची चालन देखभाल व दुरुस्ती करणेकामी र.रु.४९,७७,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२०.२.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक :- ६) १) श्री. दुगड उत्तमचंद गुलाबचंद (खुला) २) श्री. राउत शांताराम नामदेव (इमाव) ३) श्रीम. पार्टे कांचनमाला प्रकाश (खुला दि.१६/२/१०रोजी पात्र)या कार्यालय अधिक्षक (नायब तहसिलदार) पदावरील कर्मचा-यांना “प्रशासन अधिकारी” या पदावर र.रु. ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ५४०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नियुक्ती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२०.२.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक :- ७) पुणे विभागातील पाच महानगरपालिका पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,कोल्हापूर महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका, सांगली मिरज कूपवाड शहर महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये Special Regulation for the safety and security of building to counter man-made disaster बाबत विशेष नियमावलीचा समावेश करणेबाबत शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) (ए ए) अन्वये एकत्रितपणे प्रसिद्ध केलेल्या फेरबदल प्रस्तावावरील हरकती सुचना व मनपाचे अभिप्राय यावर विचार करुन मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ८) पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार श्री.आल्हाट प्रशांत पोपट यांना अनु.जाती प्रवर्गातून र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० या पे बॅन्डमध्ये भांडारपाल या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ९) निगडी येथील विद्युत दाहिनीचे तीन वर्षांकरिता चालन देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी र.रु.३१,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :-१०) पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार श्री.जगधने रतन रामचंद्र यांना खुला (अनु.जाती) प्रवर्गातून र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० या पे बँडमध्ये मुख्य वाहनचालक या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/२६३/१०
दिनांक : १०/०२/१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.